# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४
# शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा - २०२५
## प्रसिध्दी निवेदन

महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५** या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येत आहे. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्याची मुदत **दि. १०/०५/२०२५ ऐवजी दि. १४/०५/२०२५** करण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन आवेदनशुल्क भरण्याची मुदत **दि. १४/०५/२०२५ रोजी २३.५९** मि. पर्यंत आहे. याबाबतचे प्रसिद्धी निवेदन देण्यात आले होते.

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी** (TAIT) - **२०२५ परीक्षा** घेण्याचे आयोजन दि. २४/०५/२०२५ ते दि. ०५/०६/२०२५ या कालावधीमध्ये प्रस्तावित आहे. B.Ed. व M.Ed., महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षेस प्रविष्ठ असणाऱ्या विद्यार्थी/उमेदवारांचा परीक्षा कालावधी, **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५** परीक्षेच्या कालावधीत नियोजित असेल तर अशा विद्यार्थी/उमेदवारांनी आपली माहिती विहित नमुन्यात परीक्षा परिषदेने दिलेल्या https://mscepune.in/DTEDOLA/TAIT2025Info.aspx या लिंकद्वारे भरणेबाबत सूचित केले होते. सदर लिंकवरील माहिती भरण्याची मुदत १४/०५/२०२५ होती तथापि सदर मुदत **दिनांक १४/०५/२०२५ ऐवजी दिनांक 21/05/2025** रोजी सायंकाळी 06:00 **वा**. पर्यंत करण्यात येत आहे.

तरी उमेदवारांनी वर दिलेल्या लिंकद्वारे विहित मुदतीत माहिती सादर न केल्यास व उमेदवार परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल.

**ठिकाण: पुणे**
**दिनांक: १३/०५/२०२५**

**(अनुराधा ओक)**
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४

Scanned with OKEN Scanner